दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक ११० वा बुधवार दि.१३ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

# राज्याला आरक्षणाचा अधिकारच नाही

भंडारा : मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपवर चांगलाच हल्लाबोल केला आहे. राज्याला आरक्षणाचा अधिकारच नाही, हे त्याचवेळी सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे. त्यामुळे जे दिल्लीत मुजरा करायला जातात, त्यांना त्या ठिकाणीच आरक्षणाचे सांगावे, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे. संभाजीराजेंनी मराठा समाज आरक्षणाबाबत विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली, त्यावर पटोले बोलत होते.

आता योगायोगाने केंद्राचे विशेष अधिवेशन येत आहे. भाजपचे नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री सांगतात की, आम्ही त्यांचे हस्तक आहोत. तर, त्यांनी तिथे जाऊन जी ५० टक्क्यांची मर्यादा आरक्षणाची आहे, तिला उठवली पाहिजे आणि जातनिहाय जनगणना झाली पाहिजे, तरच हे प्रश्न सुटू शकतात, असा सल्ला नाना पटोले यांनी दिला.

आरक्षणासाठी दोन तासांचे विशेष अधिवेशनही पुरे

राज्याच्या विधानसभेत २०१९ मध्ये आरक्षणासाठी कायदा आणला गेला होता. पण, सुप्रीम कोर्टाने ताशेरे ओढल्याचे पटोले म्हणाले. विशेष अधिवेशनात केवळ भाषणे होतील, यासाठी दोन तासांचं विशेष अधिवेशन राज्य सरकारने बोलावून एकमताचा ठराव करून केंद्राला आरक्षणासाठी शिफारस करावी, तेही करता येते, असे पटोले म्हणाले. आरक्षणासाठी ५ दिवसांचे अधिवेशन घ्यायची गरज नाही, असेही पुढे ते म्हणाले.

दिल्लीत मुजरा करायला जाणा-यांनी तिथे आरक्षणाचे बोलावे

राज्य सरकारमधील नेते दर दोन दिवसांनंतर दिल्लीत मुजरा करायला जातात, त्या ठिकाणी त्यांनी मराठा आरक्षणाचेही सांगावे, असा टोला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लगावला.

दहीहंडी प्रकरणात नाना पटोलेंचा पोलिसांना इशारा

पुढे नाना पटोलेंनी भंडारा जिल्ह्यातील दहीहंडीवर देखील भाष्य केले. भंडारा येथे दहीहंडी कार्यक्रमादरम्यान रविवारी झालेल्या दुर्घटनेची पोलिसांनी नोंद घ्यावी.

## महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार-आ. रमेशआप्पा कराड

लातूर दि.१२- बचत गटासाठी केंद्र आणि राज्य शासनाने अनेक योजना सुरू केल्या असून घेतलेल्या कर्जाची परतफेड महिला बचत गट शंभर टक्के करतात. या बचत गटाच्या पाठीशी सक्षमपणे उभे राहून सर्व प्रकारची मदत करू. महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला, वस्तूला बाजारपेठ मिळत नाही तोपर्यंत कोणतेही उत्पादन करून उपयोग होत नाही. उत्पादित मालाला बाजारपेठ मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करू अशी ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत असलेल्या सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्र रेणापूर या संस्थेची बारावी वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहाच्या वातावरणात रेणापूर येथे पार पडली. या निमीत्ताने आयोजित महिला मेळाव्यात आ. रमेशआप्पा कराड बोलत होते. माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी एम. एस. पटेल, सहाय्यक अधिकारी सुर्यंकांत वाघमारे, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, माजी सभापती अनिल भिसे, माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, तालुकाध्यक्ष अँड दशरथ सरवदे, संगायो अध्यक्ष वसंत करमुडे, बालग्रामचे पिताभास नंदा, मानदेशी फाऊंडेशच्या गायत्री वाघमारे, जिल्हा उद्योग केंद्राचे पवार, महिला आर्थिक विकास महामंडाळाचे लखाधिकारी परमेश्वर इंगळे, प्रशिक्षण संस्थेचे सतिष कांबळे, माविमचे व्यवस्थापक मंगल वाघचौरे, सुजाता तोंडारे, अजित कांकरीया, सरिता पाटील, शरद दरेकर, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, संध्या पवार, संस्थेच्या व्यवस्थापक उषा डुमणे, संस्थेच्या अध्यक्षा सौ सरस्वती पवार, उपाध्यक्षा अनुसया फड, सचिव समेरून शेख, कल्पना मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. या वार्षिक सर्वसाधारण सभेस व महिला मेळाव्यास तालुक्यातील ३६ गावातून २४८ बचत गटातील अडीच-तीन हजाराहून अधिक महिला उपस्थित होत्या.

संसाराचा गाडा ओढण्याचे मातृ शक्तीकडू शिकले पाहीजे. पुर्वी महिलांना स्वातंत्र्य नव्हते, आज



महिला घराबाहेर पडली, गावागावात महिलांनी बचत गटाची स्थापना केली म्हणूनच बाहेरचे जग पाहता आले. अनेक योजनेमुळे प्रगती होवू लागली, बाजार कळू लागला, उद्योग कसे करावेत आणि चालवावेत याची जाणीव महिलांना होवू लागली असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की प्रत्येक बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी छोटे छोटे उद्योग सुरू करावे. त्यातून निश्चितच आर्थिक आधार मिळू शकतो. बचत गटाच्या माध्यमातून दर्जेदार आणि चांगली उत्पादने निर्माण झाली तर बाजारपेठ उपलब्ध होण्यास अडचणी येणार नाहीत. त्यातून प्रत्येकाला रोजगारही मिळू शकतो. तेव्हा महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून आपले अस्तीत्व निर्माण करावे, सामाजिक बांधिलकी जोपासावी, निश्चितपणे महिला बचत गटाच्या उत्पादनास बाजारपेठ मिळवून देण्याची ग्वाही दिली.

यावेळी जिल्हा समन्वय अधिकारी एम एस पटेल यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले. प्रारंभी संस्थेच्या उपाध्यक्षा अनुसया फड यांनी संस्थेचे अहवाल वाचन केले. प्रगती महिला बचत गट घनसरगाव, तुळजाभवानी महिला बचत गट हणमंतवाडी यांना १० लाखाचा मंजूर कर्जाचा धनादेश देण्यात आला. संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या उत्कृष्ट बचत गट, उत्कृष्ट महिला उद्योजक, उत्कृष्ट सीआरपी, उत्कृष्ट सहयोगीनी, उत्कृष्ट ग्रामसंघ यांचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी शासनाच्या विविध योजना आणि महिला बचत गट कशा पद्धतीने उद्योग व्यवसायात काम करतील याबाबत मौलिक विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहयोगीनी वैजंता हारकळ यांनी केले तर शेवटी तालुका समन्वयक उषा डूमणे यांनी उपस्थित यांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरूवातीस आ. रमेशअप्पा कराड व इतर उपस्थित मान्यवरांनी महिला बचत गटाच्या विविध स्टॉलला भेट देवून समाधान व्यक्त केले. संस्थेच्या वतीने सौ सरस्वती पवार, अनुसया फड, समेरून शेख, कल्पना मस्के सोनम राजपूत, कल्पना मस्के, प्रतिभा सुर्यवंशी, कविता कांबळे, रिहाना शेख, सावित्री आडे, तस्लीम शेख, वर्षा इंगळे, सविता गंगथडे, नाजीया शेख, मिना शिंदे, उर्मीला इरळे, दिक्षा मस्के, सुरेखा बनसोडे, महाकन्या जाधव, लक्ष्मी गायकवाड, मंदाकीनी माने, उमा सोमवंशी यांच्यासह अनेकांनी उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार केला या वार्षिक सर्वसाधारण सभा तथा महिला मेळाव्यास अडीच-तीन हजाराहून अधिक महिलांची उपस्थिती होती.

## जरांगेंची सरकारला १ महिन्याची मुदत; आंदोलन सुरुच ठेवणार

जालना - गेल्या पंधरा दिवसांपासून उपोषण करणा-या मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी सरकारला एक महिन्याचा वेळ दिला आहे. मात्र, आंदोलन सुरुच ठेवणार असल्याचं ते म्हणाले आहेत. सरकारला एक महिन्याचा वेळ दिला आहे, पण सर्वसामान्य मराठा समाजाला महिन्यानंतर आरक्षण मिळालंच पाहिजे, असे ते म्हणाले.

अहवाल कसाही आला तरी महिन्याभरानंतर राज्यात मराठ्यांना प्रमाणपत्र वाटप करावेच लागेल. आंदोलकांविरोधात महाराष्ट्रात जेवढे गुन्हे दाखल केलेत ते मागे घेण्यात यावेत. दोषी पोलिस अधिका-यांचे निलंबन करण्यात यावे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि सर्व मंत्री या सर्वांनी जबाबदारी घेतली पाहिजे. सर्वकाही मला लिहून टाईमबाऊंड द्यावं लागेल, अशा अटी त्यांनी सरकारसमोर ठेवल्या आहेत.

मराठा समाजाची बदनामी होऊ नये यासाठी हा निर्णय घेतला आहे. उपोषण सोडताना मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि दोन्ही राजे आले पाहिजेत, असंही जरांगे पाटील म्हणाले आहेत. एक महिन्याचा वेळ देत आहे. पण, आंदोलन स्थळावरुन मी हटणार नाही. समाजाने गैरसमज करु नये. ४० वर्षे दिले आहेत, आता आणखी एक महिना देऊ, असं जरांगे पाटील म्हणाले.

जरांगे पाटील यांनी सरकारसमोर ठेवलेल्या अटी

१) अहवाल कसाही आला तरी मराठ्यांना ३१ व्या दिवशी प्रमाणपत्र द्या

## दयानंद शिक्षण संस्था सचिव रमेश बियाणी यांनी अखेर त्याकर्मचाऱ्यास दिला न्याय



लातूर- दयानंद विज्ञान महाविद्यालयात गेली नऊ वर्षे विनाअनुदानित तत्त्वावर सेवक म्हणून काम करत असलेले सुभाष साठे व प्राचार्य यांच्यात गैरसमजुत झाल्याने साठे यांनी त्यांची मूळ मागणी असल्या वडिलांच्या जागी अनुकंपा तत्त्वावर मला घेण्यात यावे व कायम करावे म्हणून गेली नऊ दिवस आमरण उपोषण आपल्या कुटुंबासह करत होते.ही बाब विविध सामाजिक संघटना प्रमुख व कार्यकर्त्यांच्या लक्षात आल्यास त्यांनी संस्था सचिव रमेश बियाणी यांच्या लक्षात आणून दिली व त्यानंतर स्वतः बियाणे यांनी प्राचार्य यांच्याशी चर्चा करून स्वतःची सही असलेले एक पत्र देऊन सुभाष साठे यांना त्यांच्या वडिलांच्या ठिकाणी अनुकंपा तत्वावर कायमशेवेत करण्यात येईल असे पत्र देऊन हे आमरण उपोषण सोडले आहे.

आमरण उपोषण सोडवण्यासाठी सचिव रमेश बियाणे यांचे पत्र घेऊन प्राचार्य डॉक्टर जयप्रकाश दरगड, कार्यालयीन अध्यक्ष नवनाथ भालेराव, डॉक्टर महेश बेंबळे,बन्सी कांबळे, सतीश तांदळे, मोहशीन शेख यांनी उपोषण स्थळी जाऊन साठे यांना ते पत्र दिले व नारळ पाणी पाडून उपोषण सोडवले.

यावेळी समाज बांधव जी ए गायकवाड, नरसिंग घोडके, दिवेकर सर व आनंद वैराग्य उपस्थित होते.

अखेर संस्था सचिव रमेश बियाणी यांच्या मध्यस्थीने हे उपोषण सुटल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## (नमुमपा) सेवा निवृत्त इंजीनिअर अरविंदजी शिपूरकर यांच्या कार्यक्रमास ना. रामदासजी आठवले यांची सदिच्छा भेट

नवी मुंबई / के. एच. हनवते :-वाशी स्पोर्ट्स क्लब हॉल नवी मुंबई येथे (नमुमपा) सेवानिवृत्त इंजीनिअर - अरविंदजी शिपूरकर यांच्या सेवानिवृत्त कार्यक्रमास सदिच्छा भेट आणि सुभेच्छा देण्यासाठी भारत सरकार कॅबिनेट राज्यमंत्री व सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र राज्य ना. रामदासजी आठवले (राष्ट्रीय अध्यक्ष आरपीआय) यांची ऊपस्थित लाभली. रामदासजी आठवले यांची एक खासियत आहे की, समाजावर जिथे कुठे अन्याय अत्याचार होत आसतील किंवा छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांच्या सुख - दुःखाचा प्रसंग असो अशा ठिकाणी आवर्जून उपस्थित रहाणार वेक्तीमतव म्हणजे रामदासजी आठवले यांचा जाहीर सत्कार करताना सेवानिवृत्त




इंजिनियर अरविंदजी शिपूरकर यांचे दुर्मीळ छायाचित्र.

या कार्यक्रमास सुभेच्छा दैण्यासाठी आनेक मान्यवर उपस्थित होते (नमुमपा) अधिकारी संजय देसाई सह आनेक कर्मचारी व आधीकारी उपस्थित होते. (आरपीआय) नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे, मा. जिल्हाध्यक्ष सिद्राम ओव्हळ, सरचिटणीस एल. आर. गायकवाड, युवा कार्यकर्ता बाबा माने, समाज सेवक विरेंद्र लगाडे, गणपत शेलार, प्रा. डॉ. बळीराम गायकवाड यांनी उपस्थित राहून सेवानिवृत्त इंजीनिअर अरविंद शिपूरकर यांना पुढील कारकिर्द कार्यास मग सामाजिक, धार्मिक, राजकिय कार्यास मनापासून हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात सर्वप्रथम आपले आदर्श तथागत भगवंत गौतम बुद्ध व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व विधीवत बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात

## काँग्रेस पक्ष मराठा समाजासोबत

### आमदार धिरज देशमुख यांनी घेतली रेणापूर आणि सोनवती येथील उपोषणकर्त्या तरुणांची भेट




लातूर : मराठा आरक्षणासाठी रेणापूर तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने रेणापूर येथे आणि लातूर तालुक्यातील सोनवती येथे सकल मराठा समाजाच्या वतीने तरुणांचे बेमुदत आमरण उपोषण सुरू आहे. त्यांची लातूर ग्रामीणचे आमदार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी उपोषणस्थळी जावून भेट घेतली. काँग्रेस पक्षाच्या आणि स्वतःच्या वतीने उपोषणकर्त्या तरुणांच्या मागण्यांना त्यांनी पाठिंबा दिला. रेणापूर येथे श्री. योगेश व्यकंटराव देशमुख, श्री. संतोष नारायण शिंदे, श्री. अजय रमाकांत गाडे, श्री. धनंजय व्यकंटराव भोसले हे तरुण तर सोनवती येथे श्री. नागेश पवार, श्री. हरिप्रसाद निटुरे यांचे गेल्या चार दिवसांपासून उपोषण सुरू आहे. त्यामुळे उपोषणकर्त्या तरुणांच्या प्रकृतीची आमदार श्री. धिरज देशमुख यांनी आवर्जुन विचारपूस केली. त्यांची काळजी घेण्यासाठी संबंधितांना सूचना केल्या.

इतर समाजावर अन्याय न करता आरक्षण द्या : आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, यासाठी आम्ही विधानसभेत बाजू मांडू. केंद्र सरकारनेही यासंदर्भात संसदेच्या विशेष अधिवेशनात भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. केंद्रात आणि राज्यात भाजपचेच सरकार आहे. त्यामुळे त्यांनी वेळ न दडवता मराठा आरक्षणाचा निर्णय तातडीने घ्यायला हवा. इतर कोणत्याही समाजावर अन्याय न करता त्यांनी मराठा समाजाला सरसकट आरक्षण द्यावे.

## आ. अभिमन्यू पवार यांचा पाठपुरावा....

### मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत औसा मतदारसंघाला ३१ कोटी निधी मंजूर

औसा - आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यामुळे औसा मतदारसंघात विकासकामांसाठी भरघोस निधी उपलब्ध होत असून (दि.१२) सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ रस्ते व विकास कार्यक्रमअंतर्गत औसा मतदारसंघातील ३१ किमी लांबीच्या १० वेगवेगळ्या ग्रामीण रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी ३१ कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यामुळे औसा मतदारसंघात विविध योजनेतून कोट्यवधींचा निधी उपलब्ध झाला असून या निधीतून गेल्या अनेक वर्षांपासूनचा विकासाचा अनुशेष भरून काढण्याचा प्रयत्न केला जात आहे.यामध्येच मंगळवारी या विकास निधीत भर पडली असून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत इजिमा ९९ ते उंबडगा (बु.) ते तालुका सरहद्द रस्ता, प्रजिमा २४२ (नागरसोगा) ते तुंगी (खु.) रस्ता, राममा ३६१ हसाळा - शिंदाळा ते जमालपूर रस्ता, प्रजिमा ४९ (तालुका सरहद्द) देवंग्रा - येळी रस्ता, राममा ५४८ बी ते चलबुर्गा रस्ता, रामा २४४ ते तांबरवाडी - राजेवाडी रस्ता, इजिमा १०४ ते लाडवाडी रस्ता, कोकळगाव ते सरवडी रस्ता, जेवरी ते पिंपळवाडी रस्ता आणि जेवरी ते बामणी रस्ता या १० रस्त्यांचे दर्जोन्नती काम करण्यासाठी सुमारे ३१ कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मतदारसंघातील विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. अभिमन्यू पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व ग्रामविकासमंत्री तथा लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले आहेत.

## संपादकीय....

# हे अपत्य कोणाचे ?

आरक्षणाचा मुद्दा उकरणे हे वाघावर स्वार होण्यासारखे आहे. एकदा का वाघावर स्वार झाले की पायउतार होता येत नाही. पायउतार झाल्यास वाघ खाणार आणि न व्हावे तर किती काळ तो बसू देणार हा प्रश्न. एकनाथ शिंदे– देवेंद्र फडणवीस आणि कानामागून आलेले आणि तिखट होऊन बसलेले अजित पवार यांच्या सरकारला या सत्याची जाणीव एव्हाना पुरेशी झाली असावी. मनोज जरांगे यांनी जालन्यात राखीव जागांच्या मुद्द्यावर उपोषण सुरू केल्यापासून राज्य सरकारची असहायता पुन:पुन्हा समोर येत राहिली. मुख्यमंत्री म्हणतात मी मराठ्यांस आरक्षण देण्यास बांधील. पण कसे हे ते सांगत नाहीत. दुसरीकडे जरांगे यांच्या समर्थकांना आवरण्याच्या नादात पोलिसांनी अतिउत्साहात लाठीमार केल्याचे पाप अंगास चिकटल्यापासून गृहमंत्रीपद सांभाळणारे उपमुख्यमंत्री फडणवीस या विषयावर जरा हातचे राखून दिसतात आणि तिसरीकडे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार हात झटकत म्हणणार आपण जरांगे यांना समजावण्यात कमी पडलो! वास्तविक तेही सरकारात आहेत. सरकार कमी पडते असे वाटत असेल तर अजितदादांस चर्चेची सूत्रे स्वत:च्या हाती घेण्यापासून कोणी रोखले होते काय? ते यावर बोलणार नाहीत, चर्चा करणार नाहीत आणि वर सरकार समजावण्यात कमी पडले असे आपण जणू सरकार–बाहेरचे असल्यासारखे बोलणार. आणि या सगळ्याच्या वर सरकार जे देऊ(च) शकत नाही ते जरांगे मागणार असा हा गुंता. तो मुळात तयार झाला कारण या आरक्षणाचा उगम सामाजिक न्यायाच्या कल्पनेत नाही, तो राजकीय स्पर्धेत आहे. आणि एकदा का स्पर्धा आली की प्रतिपक्षास नामोहरम करण्याचा विचार ओघाने आलाच. मराठा आरक्षणाच्या मुळाशी तो आहे. यात आवर्जून लक्षात घ्यावी अशी आणखी एक बाब. ती म्हणजे राजकीय हेतूने प्रेरित आरक्षणाचा मुद्दा देशात कोठेही सुटलेला नाही. महाराष्ट्रात मराठा समाज, गुजरातेत पाटीदार, हरयाणात जाट, आंध्र प्रदेशात कुप्पू आणि राजस्थानात गुज्जर या सर्वांचेच आरक्षण लटकलेले आहे. अन्यांविषयी नंतर कधी. तूर्तास प्रश्न समोर आहे तो महाराष्ट्रातील मराठा समाजास आरक्षण कसे देता येईल याचा. इतकी वर्षे सत्तेत राहूनही जे काँग्रेस आणि नंतर राष्ट्रवादीस जमले नाही ते आपण करून दाखवले या ईर्ष्येतून भाजपने हा मराठा आरक्षणाचा घाट घातला. त्याआधी खरे तर पृथ्वीराज चव्हाण यांच्या सरकारने या विषयास अपयशी तोंड फोडले होते. काँग्रेस–राष्ट्रवादीचा आधारस्तंभ असलेला सर्वात मोठा मराठा घटक आरक्षणाच्या मागून आपल्याकडे येईल हा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा विचार. राजकारणात बेरजेस फार महत्त्व. त्या बेरजेच्या राजकारणास अनुसरून फडणवीस यांनी ''मराठा' तितुका मेळवावा' असा विचार केला असल्यास गैर नाही. पण हा प्रयत्न घोषणेच्या पलीकडे गेला नाही. कारण त्याची अंमलबजावणी. खरे तर या आरक्षणाशिवाय एकनाथ शिंदे, अजितदादा पवारादी मराठा नेतृत्व भाजपकडे आकृष्ट झालेलेच आहे. अर्थात त्यास सामाजिक न्यायविचारापेक्षा सरकारी न्यायपद्धती (म्हणजे ईडी, सीबीआय इत्यादी) कारणीभूत आहे हे खरे. पण ही मंडळी आल्यामुळे मराठा आरक्षणाचा तिढा सहज सोडवता येईल, असाही समज भाजप नेत्यांचा असावा. तो या मनोज जरांगे यांनी पार धुळीस मिळवला. त्यांचे जालन्यातील उपोषण अण्णा हजारे प्रभृतींच्या रामलीला दिवसांची आठवण करून देते. अण्णांच्या आंदोलनाने बाकी काही नाही तरी तत्कालीन राजकीय नेतृत्वाविषयी नाराजी तेवढी निर्माण झाली. त्यांच्या आंदोलनाचा बाकी उपयोग शून्य!

त्या इतिहासाची जरांगे यांच्या उपोषणामुळे पुनरावृत्ती होणारच नाही, असे नाही. विद्यमान सरकारलाही याची जाणीव झाल्याने या जरांगे यांस एकदा लिंबू–पाणी पाजण्यास सरकार उत्सुक दिसते. मराठ्यांना 'कुणबी' समजून सरसकट आरक्षण द्या, असे या जरांगे यांचे म्हणणे. सरकार ते कसे ऐकणार? कारण तसे केल्यास महाराष्ट्रात एकूण आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडेल. या एकाच कारणासाठी मराठा आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने या आधीही निकालात काढला. वास्तविक मराठा समाज 'अपवादात्मक परिस्थिती'त असल्याचा आणि म्हणून त्यास आरक्षणाची गरज असल्याचा युक्तिवाद राज्य सरकारने करून पाहिला. सर्वोच्च न्यायालय बधले नाही. नंतर राज्य सरकारचा प्रयत्न होता आणि आहे तो मराठ्यांस एका मोठ्या सैलसर, 'ओबीसी' नावाने वळकटीत गुंडाळणे. त्यासाठी त्यांना 'कुणबी' असे ठरवावे लागेल. पण हे कुणबीपण राज्यातील सर्वच मराठ्यांस सरसकट डकवणे अशक्य. त्यामुळे त्या अंगाने हा तोडगा निरुपयोगी ठरतो. आणि त्याच वेळी 'ओबीसी' या वळकटीत ज्यांचा समावेश आहे त्या अन्य मागांसास हे पटणारे नाही. कारण त्यांच्या आरक्षित जागांत राजकीयदृष्ट्या तगडा मराठाही वाटा मागणार. तेव्हा त्यांस हे मान्य होणे अशक्य आणि एका अर्थी रास्तदेखील. राज्य सरकार या दिशेने पावले टाकत असल्याचे दिसताच गेल्या काही दिवसांत 'ओबीसी' राज्यभरात आंदोलन करताना दिसतात ते याचमुळे. तेव्हा राहता राहिला एकच पर्याय. आरक्षणाची मर्यादा वाढवणे. पण हा पर्याय राज्य सरकारला आणि जरांगे यांस वाटतो तितका सोपा नाही. त्यासाठी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागतील आणि न्यायपीठास मान्य होईल अशा तऱ्हेने मराठ्यांस आरक्षणाची किती निकड आहे हे दाखवून द्यावे लागेल. राज्य सरकारला या परिस्थितीची पूर्ण कल्पना आहे. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयात जाणे टाळण्यासाठी सरकारने निजाम–कालीन नोंदींच्या आधारे मराठा समाजास कुणबी ठरवून मराठवाड्यातील मराठ्यांपुरता तरी प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला.

# पोटनिवडणुकीने भाजपला धडा शिकवला की 'इंडिया'ला?

देशात होत असलेल्या पोटनिवडणुकीचे निकाल ही काही नेहमीच आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकांची संभाव्य झुळूक असते असे म्हणता येत नाही. कारण या अगोदर झालेल्या पोटनिवडणुका व त्या नंतरच्या विधानसभा व लोकसभा निवडणुकांचे निकाल उलट आले हे अनेकदा सिद्ध झाले आहे. असे असले तरी जनमताचा कौल हा वेगळाच असतो. तो कोणाला कधी सत्तेतून घालवेल याचा नेम नसतो. कारण मतदार त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या मुद्द्याबरोबरच तो धार्मिक व सामाजिक मुद्द्याचाही विचार करू लागला आहे. परंतु पोटनिवडणुकीत मिळालेल्या विजयातून सत्तेमध्ये नसलेल्या विरोधी पक्षांना हर्ष वाटणे ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. यातून विरोधी पक्षांमध्ये अधिक जोर लावून पुढील निवडणुका लढण्याचा हुरूप येत असतो. नुकतेच ८ सप्टेंबरला घोषित झालेल्या पोटनिवडणुकांचे निकाल संमिश्र आले असले तरी पुढील विधानसभा व लोकसभांची दिशा ठरविणारे आहेत. या निकालांतून सध्या तरी भाजपेतर विरोधी पक्षांची एकजूट झालेली दिसते, त्या दृष्टिकोनातून 'इंडिया' आघाडीच्या भविष्यासंदर्भात चर्चा होणे आवश्यक आहे. सात विधानसभा मतदारसंघांत झालेल्या पोटनिवडदणुकामध्ये 'इंडिया'च्या घटक पक्षांना एकूण चार, तर भाजपला तीन जागांवर विजय मिळाला. या पोटनिवडणुकामध्ये भाजपचा पराभव झाल्याचे दिसत नसून त्यांनी जागांची संख्या कायम ठेवली आहे. भाजपला पश्चिम बंगाल मधील धूपगुडी मतदार संघात तृणमूल काँग्रेसकडून हार पत्करावी लागली असली तरी, त्रिपुरातील बॉक्सनगर मतदार संघात भाजपने मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पराभव केला. तर उत्तराखंडमधील बागेश्वर व त्रिपुरातील धानपूर मतदारसंघ कायम राखला. काँग्रेसने केरळातील पुथुपल्ली व झारखंड मुक्ती मोर्चाने दुमरी हे मतदारसंघ आपल्याकडे कायम राखले आहेत. त्यामुळे हे निकाल सर्वासाठी समसमान असून केवळ मताच्या टक्केवारीमध्ये कमी अधिकपणा आलेला आहे. आणि हीच टक्केवारी पुढे होणाऱ्या निवडणुकातील सूत्र ठरण्यास कारणीभूत ठरणार आहे. पण 'जागा ज्या पक्षाकडे होती त्याच पक्षाकडे कायम राहिली' हे सरळसाधे विधान, उत्तर प्रदेशातील घोसी मतदारसंघात मात्र वाटते तितके साधे राहिले नाही, ते कसे? जागा राखली की भाजपकडून खेचली?




उत्तर प्रदेशातील घोसी मतदार संघातून आलेला निकाल हा भारतीय जनता पक्षासाठी धक्कादायक तर 'इंडिया' आघाडीसाठी सुखकारक आहे. कारण घोसी मतदारसंघात समाजवादी पक्षाच्या उमेदवाराने मूळचे समाजवादी पक्षाचेच, पण भाजपमध्ये गेलेले दारासिंह चौहान यांचा ४२,७५९ इतक्या मताधिक्यांनी पराभव केला. हे दारासिंह चौहान या मतदारसंघातील मजबूत उमेदवार मानले जात. त्यांची सामाजिक व राजकीय सुरुवात ही बहुजन समाज पक्षाचे संस्थापक कांशीराम यांच्यासोबत झाली होती. बहुजन समाज पक्षाचा नेता व आमदार म्हणून ते परिचित होते. परंतु राजकीय महत्वाकांक्षेमुळे त्यांनी बसपमधून समाजवादी पक्षात आणि तिथून मग भाजपमध्ये असा पक्षबदल केला. याच घोसीमधून पावणेदोन वर्षांपूर्वी भाजपचे ओमप्रकाश राजभर यांच्यापेक्षा २२,२०० हून अधिक मते या दारासिंह चौहान यांनी समाजवादी पक्षाच्या तिकिटावर मिळवली होती. मात्र त्यांनी समाजवादी पक्षाचा राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केला. पोटनिवडणुकीमध्ये दारासिंह चौहान यांना निवडून आणण्यासाठी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि विशेष म्हणजे बोलघेवडेपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या ओ. पी.राजभर आणि संजय निषाद यांनी आपली प्रतिष्ठा पणास लावली होती. घोसीमध्ये भाजप उमेदवाराच्या पराभवामुळे ओ. पी.राजभर, दारासिंह चौहान, संजय निषाद यांच्यासारख्या निष्ठाबदलू नेत्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेला चाप तर बसलाच परंतु 'दंगलखोरांना धडा शिकवा' असे आवाहन या निवडणुकीच्या प्रचारसभेत करणारे मुख्यमंत्री आदित्यनाथ व भाजप यांचे उणेपणही स्पष्ट झाले.

### बसपसह 'इंडिया'लाही इशारा

घोसी मतदार संघाचा निकाल बहुजन समाज पक्षालाही इशारा देणारा आहे. बसप प्रमुख मायावती यांनी घोसीमध्ये आपला उमेदवार न देता समर्थकांना 'नोटा'वर मदतान करण्यास सांगितले. परंतु बसपला मागील २०२२ च्या निवडणुकीत मिळालेल्या २१.१२ टक्के समर्थक मतदारांनी त्याकडे पाठ फिरवून समाजवादी पक्षाच्या उमेदवारास पाठिंबा दिल्याचे विजयी मतसंख्येवरून दिसते. तर नोटास केवळ १७२८ इतके मतदान झाले. याचा अर्थ आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये मायावतींच्या 'एकला चलो रे' या सूत्राला झटका बसत असून बसपच्या सध्याच्या १० खासदाराच्या संख्येत घट होऊन पक्षाची शून्यावर बोळवण होऊ शकते. मायावतींनी आपल्या परंपरागत व्होटबँकेच्या बदललेल्या मानसिकतेचा व आजच्या परिस्थितीचा अंदाज घेऊन, आपल्या डावपेचात बदल करून घेतला पाहिजे इतका इशारा या पोटनिवडणुकीने त्यांनाही दिला.

'इंडिया' आघाडीच्या घटक पक्षांनी – मुख्यत: काँग्रेस, आप, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, शिवसेना व डाव्या पक्षांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या विरोधात 'एकास एकच' उमेदवार दिल्यास पुढील लोकसभा निवडणुकात वेगळे चित्र बघायला मिळू शकेल. याची झलक घोसी मतदार संघात भाजपच्या उमेदवारास आताच्या पोटनिवडणुकीत मिळालेल्या ३७.५४ टक्केवारीच्या तुलनेत समाजवादी पक्षास मिळालेल्या ५७.१९ टक्केवारीवरून दिसून येते. असे असले तरी भाजपला २०२२ च्या निवडणुकीत मिळालेली ३३.५७ टक्के मते आणि २०२३ च्या (३७.५४ टक्के) मतांची तुलना केल्यास भाजपच्या मतपेढीत ३.९७ टक्के मतांची वाढ झालेली आहे.

मात्र, उत्तराखंडमधील बागेश्वर या भाजपसाठी सुरक्षित मानला गेलेल्या मतदार संघात काँग्रेसला सन २०२२ (२६.८८ टक्के) च्या तुलनेत २०२३ मध्ये मिळालेल्या (४५.९६ टक्के) मतांमध्ये १९.०८ टक्क्याची भरघोस वाढ झाली असली तरीही काँग्रेसला पराभव पत्करावा लागला– कारण भारतीय जनता पक्षाच्या टक्केवारीमध्ये मागील निवडणुकीत मिळालेल्या मतांच्या तुलनेत ६.४ टक्क्याची वाढ झाली आहे. या निवडणूक आकड्यावरून भाजपच्या मतसंख्येत कमतरता न येता ती वाढत असल्याचे लक्षात येते. हा विरोधी पक्षासाठी चिंतेचा विषय असायला हवा.

यावरून विरोधी पक्षांनी युती न करता २०२४ च्या लोकसभा निवडणुकीस सामोरे गेल्यास त्यांना पराभवास सामोरे अटळ असून पुन्हा भारतीय जनता पक्ष सत्तेत येईल. त्यानंतर शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे म्हणतात त्याप्रमाणे पुढे देशात निवडणुका होण्याची शक्यताच नष्ट होईल की काय! या भीतीचे सावट खरे ठरेल की नाही याचीही स्पष्टता नंतरच्या काळात येईल. परंतु त्यापेक्षा विरोधी पक्षांनी भारतीय जनता पक्षाच्या विरोधात एकास एक उमेदवार न दिल्यास उत्तराखंड मधील बागेश्वर मतदार संघासारखी परिस्थिती सगळीकडे निर्माण होऊ शकते, याचे भान 'इंडिया' आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी लक्षात घ्यावयास हवे. एवढा धडा 'इंडिया'ने शिकायलाच हवा.

# अर्थसंकल्पीय तरतुदीऐवजी 'दात कोरून..'?

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंच्या नावे दिल्या जाणाऱ्या राज्य 'आदर्श शिक्षक पुरस्कार' कार्यक्रमात शालेय शिक्षणमंत्र्यांनी महत्त्वाच्या घोषणा केल्या. महाराष्ट्रात एक 'नवं युग' आणण्याचा दावा करत ''राज्यातील कंपन्यांच्या 'सीएसआर'चा (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी) पैसा सरकारी शाळांकडे वळवून शाळांचा दर्जा राखण्याची जबाबदारी त्या कंपन्यांची'' केली जाईल, असं सांगितलं. यामुळे ''कोणत्या कंपनीची शाळा चांगली आहे अशी स्पर्धा शाळाशाळांमध्ये लागेल'' (व दर्जा सुधारेल). या बदल्यात, ''जी कंपनी स्पॉन्सर करेल तिचं नाव पाच किंवा दहा वर्षांसाठी शाळेला'' लावलं जाईल. जवळपास ६५,००० सरकारी शाळांमधील ''इन्फ्रास्ट्रक्चर सुमार दर्जाचं असल्यामुळं जे ज्ञान माननीय पंतप्रधान आपल्याला देऊ इच्छितायत'' ते देण्यात अडचणी येतायत, म्हणून ही योजना आणलीय. 'दत्तक देणे' या शब्दाचा वापर टाळून मांडलेली योजना म्हणजे 'शाळांचं दत्तकविधान' आहे. तिथं उपस्थित अर्थ तथा उपमुख्यमंत्र्यांनी ''आपल्या राज्यात काही हजार कोटी रुपये सीएसआर निर्माण होतो, पण बहुतेक जण महाराष्ट्रात खर्च करत नाहीत,'' असं सांगून ''यातला ५० टक्के पैसा जरी राज्यात खर्च झाला तर सगळ्या शाळांचं इन्फ्रास्ट्रक्चर वाढेल,'' असा आशावाद व्यक्त केला. शिक्षकदिनी सरकारी शिक्षकांचा सत्कार करतानाच सरकारी शाळांची गुणवत्ता खासगी कंपन्यांवर सोडून देण्याचं, एरवी धाडसी वाटणारं काम मंत्रीद्वयानं सहज केलं. ज्या 'सीएसआर'चा पुनरुच्चार व जयघोष करत सरकारने गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या घटनादत्त व बंधनकारक कर्तव्यातून पलायनाची वाट आखून घेतलीय, त्याचा विचार थोडा बारकाईनं करणं औचित्याचं ठरेल. 'कंपनी कायदा २०१३'च्या कलम १३५ नुसार केवलमूल्य ५०० कोटींपेक्षा जास्त किंवा उलाढाल १००० कोटींपेक्षा जास्त किंवा वार्षिक नफा पाच कोटींपेक्षा जास्त असलेल्या प्रत्येक कंपनीने तिच्या तीन वर्षांच्या सरासरी नफ्याच्या दोन टक्के इतकी रक्कम 'सीएसआर' स्वरूपात समाजोपयोगी कामासाठी खर्च करणे बंधनकारक आहे. हा कायदा लागू झाल्यापासून म्हणजे २०१४–१५ ते २०२१–२२ या आठ वर्षांच्या कालावधीत देशपातळीवर खर्चित 'सीएसआर'च्या रु. १,५३,५५१ कोटींपैकी ७६,१७९ कोटी रु. म्हणजे जवळपास निम्मा खर्च शिक्षण आणि आरोग्यावर झालाय. या दीड लाख कोटींपैकी महाराष्ट्राचा वाटा सर्वाधिक म्हणजे २३,८८६ कोटी रु. आहे. या खालोखालच्या कर्नाटक, गुजरात, तमिळनाडू या राज्यांचा एकत्रित हिस्सा महाराष्ट्रापेक्षा थोडा कमी म्हणजे २३,५६१ कोटी रु. आहे. राज्याच्या स्थापनेपासून औद्योगिकीकरणात राज्याने घेतलेल्या आघाडीचं हे निदर्शक आहे. मात्र २०१४–१५ ते २०२१–२२ दरम्यानच्या राज्यवार 'सीएसआर'वाढीच्या दराचा आढावा घेतला तर महाराष्ट्र थेट १७ व्या क्रमांकावर दिसतो. शिवाय 'सीएसआर'मधली आंतरजिल्हा विषमता शब्दश: भीषण आहे. उदाहरणार्थ, शिक्षण (व अपंगत्व तथा उपजीविका) अंतर्गत २०१४–१५ ते २०२०–२१ पर्यंतच्या सात वर्षांत पुणे जिल्ह्याला सर्वाधिक म्हणजे रुपये १,०२६ कोटी मिळाले. याच कालावधीत वाशिमला सर्वात कमी म्हणजे केवळ ७४ लाख, परभणीला केवळ ७६ लाख, तर हिंगोलीला केवळ ८६ लाख रुपये मिळाले. 'सीएसआर'च्या वाटय़ातूनही राज्यातील 'विकासाचा अनुशेष' असा लख्ख दिसतो. कंपन्यांनी घोषित केलेल्या जिल्ह्यांनुसार राज्यातील प्रथम आणि शेवटच्या जिल्ह्यांमधली शिक्षणातील 'सीएसआर'ची सात वर्षांची एकत्रित तफावत तब्बल १,३८,६५४ टक्क्यांची आहे. वरचे पाच (पुणे, मुंबई, रायगड, ठाणे, औरंगाबाद) आणि तळाचे पाच (वाशिम, परभणी, हिंगोली, बीड, जळगाव) जिल्हे तुलनेला घेतले तरी ही तफावत तब्बल २७,९०३ टक्के इतकी प्रचंड आहे. पुणे व मुंबईला मिळालेला एकूण निधी उर्वरित सर्व जिल्ह्यांच्या एकत्रित निधीच्या दीडपटीपेक्षा जास्त आहे. याशिवाय, उपरोक्त कलम १३५ मधील पोटकलम ५ नुसार कंपन्यांनी 'आपल्या कार्यक्षेत्राच्या आसपासच्या, स्थानिक भागाला प्राधान्य देणं' अपेक्षित आहे. 'सीएसआर'संबंधी कायदा केंद्र सरकारच्या अखत्यारीतला असल्यामुळं नवनवे आदेश काढून सीएसआरचा निधी कधीही वळवला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, २०२० च्या पूर्वार्धात 'पीएमकेअर्स'ला दिला जाणारा निधी 'सीएसआर'मध्ये ग्रा धरण्यात आल्याच्या प्रसिद्धीपत्रकानंतर ऐन करोनाच्या वर्षांत अनेक सरकारी व खासगी कंपन्यांचा 'सीएसआर' मोठय़ा प्रमाणात 'पीएमकेअर्स'कडे वळाला. मग 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत जनजागृती मोहिमा राबवणं, झेंडे वितरित करणं 'सीएसआर'चा निधी देण्याची 'मुभा' देण्यात आली.

अशा प्रकारे 'सीएसआर' म्हणजे 'एक अनार, सौ बीमार' अशी गत झालीय. एखाद्या राज्यात तथाकथित 'डबल इंजिन' सरकार असलं तरी मध्यवर्ती सरकारचे आदेश राज्यांच्या आदेशांपेक्षा प्रबळ असल्यामुळं तो निधी गृहीत धरून केलेलं नियोजन कोलमडू शकतं. या पार्श्वभूमीवर 'सीएसआर'च्या जोरावर सरकारी शाळांसाठी 'नव्या युगाची' योजना दिशाभूल करणारी, अव्यवहार्य आणि धोकादायक ठरते. उपरोक्त कार्यक्रमात शालेय शिक्षणमंत्र्यांनी ज्या इन्फ्रास्ट्रक्चरचा उल्लेख केला त्यात 'चांगले रंगकाम, चांगली चित्रे, चांगले छप्पर (इमारत), बसायला चांगले बेंच, इंटरॲक्टिव्ह टीव्ही' या साऱ्यांचा समावेश आहे. राज्यातील ६५,००० शाळांसाठी प्रत्येकी केवळ दोन लाख रुपयांची तरतूद सरासरी धरली तरी पहिल्याच वर्षी १,३०० कोटी रुपयांची गरज भासेल. त्यातही पश्चिम महाराष्ट्रात एकवटलेला 'सीएसआर'चा निधी राज्यात इतरत्र वळवणं आदर्श शिक्षकांसमोर भाषण करण्याइतकं सोपं नाही. मध्यवर्ती सरकारकडून तसे आदेश निर्गमित करून घ्यावे लागतील; मात्र कॉर्पोरेट जगताचा दबदबा व पडद्याआडची ताकद पाहता हे शक्य नाही. एक वेळेस एखादं सरकार बदलेल, पण कॉर्पोरेट जगताच्या सहमतीविना कोणताही मुद्दा रेटता येत नाही. नफ्यातल्या २ टक्क्यांच्या बदल्यात कॉर्पोरेट जगताला समाजोपयोगी कामातले प्राधान्यक्रम ठरवून स्वत:साठी चिरकालीन सद्भावना निर्माण करण्याची अफाट संधी २०१३ च्या 'कंपनी कायद्या'ने दिलीय. यामागे कॉर्पोरेट जगताचा दबाव नव्हता, असं ठामपणे म्हणता येत नाही. तसं असतं तर विविध करांवरील अधिभाराप्रमाणे (सेस) सरकारने या २ टक्केअंतर्गतचा निधी वेगळा जमा करून समाजोपयोगी कामासाठी वापरला असता.

# गरिबीच्या आडून सोन्या चांदीचे प्रदर्शन...

भारतात नुकतीच ऋ-२० परिषद पार पडली. एखाद्या आतंरराष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष पद भारताकडे येत असेल तर हा प्रत्येक भारतीयांचा गौरव आहे. देशाचा मान सन्मान ज्या ठिकाणी वाढतो त्या ठिकाणी प्रत्येक भारतीय नागरिकांना देशाप्रती अजून जास्त आपुलकी निर्माण होऊन भारतीय असल्याचा अभिमान निर्माण होणे हे जिवंत व जागृत माणसाचे लक्षण आहे. गेल्या वर्षभरात जी ट्वेन्टी परिषदेचे सदस्य भार-तातील वेगवेगळ्या शहरात जाऊन तेथील आढावा घेतला. जी ट्वेन्टी परिषद भारतात होणार परकीय पाहुणे देशात येऊन पाहणी करणार म्हटल्यावर सर्व यंत्रणा कामाला लागली. ज्या ज्या शहरात जी ट्वेन्टी परिषदेचे सदस्य भेटी देणार ते शहरे करोडो रुपये खर्च करून स्वच्छ करण्यात आली. शहराचे सुशोभीकरण करण्यात आले. मुख्य रस्त्यावरचे अतिक्रमण काढून रस्त्याचे रुंदीकरण करणे, मोठ्या रस्त्यावर दुभाजक टाकून ठिक ठिकाणी संरक्षण कटगरे तयार करण्यासारखे अनेक लहान मोठे काम केले गेले. या परिषदेमुळे अनेक शहराचा कायापालट करण्यात आला. रंगरंगोटी व चित्राच्या माध्यमातून आकर्षक चित्रकलेचीही जाणीव भारतीय लोकांना झाली. आणि विषेश म्हणजे सरकारने जर मनावर घेतले तर संपुर्ण देशाचा विकास व्हायला काहीच वेळ लागणार नाही याची जाणीव ही लोकांना झाली. ज्या शहरात जी ट्वेन्टी परिषदेचे सदस्य येणार आणि त्या शहरात रस्ते बरोबर नसतील, सांडपाण्याची योग्य सुविधा नसेल, रस्त्यावर हिरवळ नसेल तर आठ दिवसाच्या आत सर्व उपाययोजना करून पाहुण्याचे स्वागत करण्यासाठी तयार झालेला भारत काहीही करू शकतो. याची प्रचिती भारतीयांना आली. काम करण्यासाठी केवळ शासन प्रशासनाची इच्छा आवश्यक असते. म्हणजे जी ट्वेन्टी च्या नावे खाली का होईना सरकार ची कार्य क्षमता जनतेच्या लक्षात आली. कामाचा वेग, सार्वजनिक ठिकाणी ची स्वच्छता बघुन प्रत्येक भारतीय लोकांना असेच वाटत होते अशा आंतरराष्ट्रीय परिषदा दरवर्षी आपल्या देशात व्हाव्यात म्हणजे कामे तरी मार्गी लागतील. हे सर्व करत असताना मात्र सरकारने काही गोष्टी जाणीव पुर्वक लपण्याचा प्रयत्न करून आपल्या देशाची श्रीमंती, विकास दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतु सत्य हे सत्य असते. सत्य कधीच लपत नाही. आणि सत्य लप-वून खोटेपणाचा दिखावा जास्त दिवस टिकत नाही. जी ट्वेन्टी परिषदेच्या माध्यमातून जेव्हा जेव्हा शहरात परिषदेचे सदस्य येणार तेव्हा तेव्हा त्या शहरातील ज्या नाल्याचे काम केले नाही असे नाले, सार्वजनिक ठिकाणचे कचरा साठवण्याच्या जागा, गोरगरीब लोकांचे संसार सरकारने लपवून ठेवले. समोरून पडदे लाऊन त्यावर ध्वज सदृश्य रंग वा फुलांचे नक्षीकाम केलेले साहित्य लावले. आणि सुशोभीकरण केलेल्या पडद्यामागे लपवला खरा भारत देश. ज्या लोकांच्या मेहनतीवर देशाची अर्थव्यवस्था आहे त्याच लोकांना पडद्यामागे लपवून देशाचा विकास दाखवण्यात आला. देशातील वेगवेगळ्या शहरातील श्रमिक, कष्टाळू, मेहनती लोकांचे संसार एका पडल्याने झाकुन त्यांचे मुलभूत हक्क देखील त्या दिवसापुरते हिरावून घेतले. पडद्याच्या समोर कोणाला येऊ दिले जात नव्हते, सामान्य मानसाला फिरू दिले जात नव्हते. देशातील गरिबी झाकण्यासाठी जो प्रयत्न केला गेला तोच प्रयत्न गरिबांच्या जिवनावर खर्च केला असत तर सरकारला लपवालपवी करण्याची वेळ आली नसती. वर्षे भर चाललेल्या या परिषदेचा समारोपीय कार्यक्रम दिल्ली येथे पार पाडला. या कार्यक्रम अर्थात हि परिषदेचा शेवटचा भाग होय. याला अंदाजे चार हजार करोड पेक्षा जास्त खर्च झाल्याचे वृत्त समोर येत आहे. जी ट्वेन्टी च्या शेवटच्या या सभेसाठी दिल्ली बंद करण्यात आली. दिल्लीमधील सुद्धां गोर गरिब लोकांचे सुखाचे निवासस्थान झाकुन घेण्यात आले आणि त्यांना बाहेरही येऊ देण्याची मुभा दिली गेली नाही. पडद्याच्या पलीकडील गरीबी परकीय नेत्यांपासुन लपवून ठेवण्याचा मुख्य उद्देश आहे तरी कोणता? केवळ देशाचा मोठेपणा दाखवून देशातील जनतेच्या मुलभूत हक्कावर बंधने आणने, सत्य परिस्थिती लपवणे याला विकास म्हणायचे का? देशात जी ट्वेन्टी परिषद पार पडणार आणि त्यामुळे शहरातील रंगरंगोटी, स्वच्छता व सुशोभीकरण होत आहे याचा सर्वात जास्त आनंद याच गरिब लोकांना झाला. ते आर्थिक दृष्ट्या गरिब असतील कारण त्याला सरकारचे ध्येयधोरणे कारणीभूत आहेत. जर लोकांच्या गरिबीला सरकारचे ध्येयधोरणे कारणीभुत नसतील तर गोरगरीब लोकांचे सुखाचे व आनंदाचे संसार सरकारला झाकण्याची वेळ का आली. याचाच अर्थ या गोरगरीब लोकांचा पैसा सरकारनेच हडप केलेला आहे. म्हणून परदेशात आपली नामुष्कीची वेळ येऊ नाही म्हणून हा प्रकार केला गेला. लोक सरकारच्या ध्येयधोरणामुळे आर्थिक दृष्टीने गरिब असतील परंतु राष्ट्रवाद व मेहनत या बाबतीत ते खुप श्रीमंत आहेत. तेवढा राष्ट्रवाद व मेहनत सरकारमध्ये बसलेल्या लोकांना घेणे कधीच शक्य नाही. परंतु मेहनती लोकांना पुरेसे शिक्षण, हाताला नियमित काम, पौष्टिक अन्न, आरोग्य सुविधा, चांगले निवास सरकार देऊ शकले नाही. देशात आजही कितीतरी अन्न वस्त्र निवारा या साठी संघर्ष करावा लागतो. शिक्षण व आरोग्य हे तर आजही त्यांच्या पासून दुर आहे. बाकीच्या बाबी तर त्यांच्या कल्पनेच्या बाहेरच्या आहेत. अशा या गरिब, बेरोजगार लोकांच्या देशात महागाईचा विस्फोट असताना समस्याच्या विखळ्यात अडकलेली जनता असताना परदेशी पाहुण्या साठी जेवनाची व्यवस्था केली जाते. भारतीय संस्कृती नुसार आपल्या घरी कोणताही व्यक्ती आला तर त्याचा पाहुणचार करणे आपले कर्तव्य आहे. त्यामुळे जी ट्वेन्टी परिषदेच्या निमित्ताने आलेल्या विदेशी पाहुण्यांचा पाहुणचार करणे हा आपल्या नितीमत्ता व संस्कृती चा भाग आहे. पण देशातील जनता उपाशी झोपताना, देशातील जनता महागाई मध्ये होरपळून निघताना सरकारने पाहुण्यांना सोन्या चांदीच्या ताटात जेऊ घालावे, पाणी प्यायला चांदीचे विषेश ग्लास बनवून पाहुण्यांचा पाहुणचार करणे म्हणजे उपाशी झोपणाऱ्या, डोक्यावर छत नसलेल्या बेरोजगारीचे चटके सोसणाऱ्या लोकांची थट्टाच करणे नव्हे का?भारताचे प्रधानमंत्री जेव्हा विदेशी दौऱ्यावर जातात तेव्हा त्यांच्या ही जेवणाचे फोटो व्हायरल होतात. प्रधानमंत्री विदेशात गेले तर यांना काचेचा ग्लास आणि स्टीलच्या प्लेटमध्येच जेवन मिळते. मग भारतात सोन्या चांदीचे भांडे बनवून त्यात पाहुण्यांना जेवू घालने म्हणजे सरकार ला नेमके काय सिद्ध करायचे आहे? आपली कुवत बघून खर्च करणे यात गैर नाही परंतु केवळ मोठेपणा करून स्वतः ची जाहिराती वर भर देऊ घरातील लोकांना अन्न कपडे व छत मिळत नसेल आणि त्यावर लक्ष नसेल तर हा घरातील अर्थात देशातील लोकांसोबत केलेली फसवेगिरी आहे. जनकल्याणासाठी पैसे नाहीत असे भासवणारे हे सरकार एका परिषदेसाठी चार हजार करोड पेक्षा जास्त खर्च करत असेल तर मात्र मग प्रश्न उपस्थित राहतो. गरिबांचे संसार झाकुन ज्यांना सोन्या चांदीच्या ताटात जेवन गोड लागत असेल त्या व्यक्तीकडे सर्वसामान्य लोकांविषयी काय भावना असतील? एक दिवस गरिबांचे सुखाचे संसार झाकुन सरकारला विकास दाखवावा लागत असेल तर हेच आपण मागासलेले आहोत याचे खुप मोठे उदाहरण आहे. मराठी म्हण आहे रिकाम्या भांड्याचा खणखणाट फार. रिकामे भांडे जास्तच आवाज करतात. याचाच अर्थ सोन्या चांदीच्या ताटात पाहुण्यांचा पाहुणचार करून पैशाचा दिखावा करणाऱ्या सरकारची तिजोरी रिकामी झाली आहे हेच तर सिद्ध होत नसेल ना. सरकारने ने कितीही दिखावा केला, कितीही बडेजाव करून सत्य लपण्याचा प्रयत्न केला तरीही पडद्या मागे गरिबी लप-वून सोन्या चांदीच्या  भांड्याचे प्रदर्शन जरी केले तरीही आम्ही विकासाच्या वाटेवर वरच्या स्थानावर आहोत हे सिद्ध करता येणार नाही. जनतेच्या पैशातून जनतेला बाजुला सारुन किती देखावा केला, प्रदर्शन केले तरी हा देखावा प्रदर्शन खुप जास्त काळ नसते. म्हणून गरिबांचे संसार झाकुन सरकार स्वतः चे कर्तृत्व दाखवत नाही तर स्वतः चे अपयश लवपत आहे हे सर्व जनतेला कळाले आहे.

--------

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर

# संजीवनी वनौषधी बेट

लातूर जिल्ह्यातील वडवळ (ना.) या गावाच्या पश्चिमेकडे एक टेकडी आहे, त्यावर अनेक दुर्मिळ वनौषधी आहेत. फार पुरातन काळापासून या टेकडीस संजीवनी वनौषधी बेट असे संबोधतात. जन रूढीत काहीतरी विशेष लक्षणीय असल्याशिवाय किंवा त्याच्या प्रचितीशिवाय असे नामकरण होत नाही. म्हणूनच या बेटाच्या नावातच त्याच्या औषधी लक्षणाचा इतिहास दडला आहे. येथील वनौषधी सेवन केल्यानंतर रोगापासून मुक्तता मिळाल्याचा येथे भेट देणा-या रुग्णांचा अनुभव आहे. नैसर्गिक वायूच्या बाहेर पडण्याच्या क्रियेमुळे अनेक लहान-मोठ्या नलिका-वाहिकांमुळे तो सच्छिद्र म्हणजे स्पंजसारखा झालेला आहे. या नलिकांतून खडकाच्या सच्छिद्रतेमुळे संभवत: भूजल साठ्यातील पाणी टेकडीच्या वरील भागात आतील नैसर्गिक वायू बाहेर पडण्याच्या क्रियेमुळे वर येऊन पसरत असावे व यातून वनौषधीचे पोषण होत असावे. या बेटावरील काही ठिकाणचा खडक तर एकदम चमकदार काळपट व लालसर रंगाचा जणू काही नुकतेच ऑईल पेंट लावल्याप्रमाणे दिसतो. कदाचित भूजल वरील भागात खेचून येऊन पसरत असल्यामुळे तो मनाचे आरोग्य राखले जाते. येथून मनाला मोहित करणा-या निसर्गाचे दर्शन होते. या ठिकाणी सूर्यास्ताचे विलोभनीय दृश्य दिसते व डोळ्याचे पारणे फिटते.

संजीवनी तलाव गुंज बेट

या बेटाच्या शेजारी एक लहान टेकडी आहे. त्यास गुंज बेट म्हणतात. यावर प्रामुख्याने काळी, पांढरी व लाल गुंजाच्या वेली आढळतात. बेटाच्या पायथ्याशी एक जलाशय आहे. जलाशयास संजीवनी तलाव असे संबोधतात. सन १०९९ मध्ये म्हणजे एक हजार वर्षांपूर्वी राजा



दरवर्षी साधारणपणे सप्टेंबर महिन्यात येणा-या उत्तरा नक्षत्रात येथे फार मोठी यात्रा भरते. या यात्रेत रुग्ण, वैद्य व हौशी पर्यटकांची संख्या फार असते. उत्तरा नक्षत्रात येणारे रुग्ण या बेटावर तीन दिवस वास्तव्यास असतात. या तीन दिवसांत ते या बेटावरील वनौषधी (झाडपाला) खातात. तीन दिवसांनंतर घरी परतताना या बेटाच्या पायथ्याशी असलेल्या संजीवनी तलावाच्या शेजारी दगडाच्या चुली मांडून तलावातील पाण्यात काळ्या साळीचा भात शिजवतात व त्यावर गायीचे तूप टाकून सेवन करतात. 'पत्तों में ही परमात्मा है'असे म्हणून रोगमुक्तीचा आनंद चेह-यावर घेऊन समाधानाने घरी परततात. पूर्वापार काळापासून येथे अशी परंपरा आजही चालू आहे.

खडक, मातीचे वेगळे वैशिष्ट्य

गावापासून दोन कि.मी. अंतरावर असलेल्या या बेटावरील माती ताम्र रंगाची आहे. तर येथील खडक वैशिष्ट्यपूर्व काळपट-लालसर रंगाचा व सच्छिद्र आहे. या खडकाच्या तुकड्यास केंगल असे संबोधतात. या खडकाचे वैशिष्ट्य म्हणजे तो वजनाला हलका व ठिसूळ असा आहे. त्यावर अनेक नलिकार छिद्रे दिसून येतात. कदाचित भूगर्भातील तसा दिसत असावा, असा कयास मांडता येईल. काही भागातील खडक एकदम ठिसूळ व वजनास अत्यंत हलका आढळून येतो. हा खडकाचा तुकडा उचलून जिभेवर ठेवला तर तो सहजच जळूप्रमाणे घट्ट चिकटतो.

वास्तूचा पाया आणि उखळे

या बेटावर अनेक ठिकाणी खडकात कोरलेली लहान-मोठी उखळे आजही सुस्थितीत आढळून येतात. यावरून फार पुरातन काळी या खडकातील उखळांव्दारे रुग्ण व वैद्य ताजी वनौषधी कुटून ताजा स्वरस मिळवीत असावेत. या बेटाच्या माथ्यावर काही ठिकाणी वास्तूच्या भिंतीच्या पायाचे अवशेष दिसून येतात. यावरून प्राचीन काळी येथे रसशाळा अथवा आरोग्यधाम असावे.

ओझोन पॉईंट किंवा सनसेट पॉईंट

बेटाच्या पश्चिमेकडे म्हणजे सर्वांत शेवटचे टोक म्हणजेच सनसेट पॉईंट होय. येथे टोकावर विशाल खडक आहे. येथे येणारे रुग्ण बेटाच्या कडेने फेरी मारून औषधी सेवन केल्यानंतर या विशाल खडकावर येऊन बसतात. येथे खूपच सुंदर हवा मिळते व श्रमाचा परिहार होऊन विक्रमादित्य चालुक्य यांनी वडवळ नागनाथाच्या संजीवनी बेटावरील वनस्पती संपदा जपण्यासाठी पहिला पाझर तलाव बांधल्याची नोंद लातूर जिल्हा दर्शनिके (गॅझेट) मध्ये मिळते.

उत्तरा नक्षत्राचे महत्त्व

या बेटावर वैद्य व रुग्ण साधारणपणे उत्तरा नक्षत्रात येतात, कारण आयुर्वेद शास्त्रानुसार पावसाळ्यानंतर या कालावधीत लहान-मोठ्या वेली व वनस्पतींची उगवणूक होऊन त्या रस, वीर्य, विपाकांनी परिपूर्ण असतात. म्हणून वैद्य लोक हे त्यांना वर्षभर लागणा-या वनौषधी याच काळात घेऊन जातात म्हणून या बेटास वैद्य व रुग्णांची पंढरी संबोधली जाते. या बेटावर मदन फळ, चित्रक, भुईकोहळा, वराहकंद, निमिर्रमली, भुताकेशी, अनंतमूळ, रान मिरची, रान करटोली, पाषाण भेद, पित पापडा, खडक शेपू, माल कांगोली, अर्जुन सादडा, कोळ मका यासारख्या दुर्मिळ वनौषधी आजही आढळतात. परंतु, वराहकंद, भुई कोहळा, रान मिरची, रान कर्टोली यासारख्या जमिनीत कंद असणा-या वनौषधी मुळापासून काढून नेण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीमुळे नामशेष होऊ पाहात आहेत.

# लातूर शहरात मंडप, पेंडॉल तपासणीसाठी पथके गठीत

लातूर, दि. १२ (जिमाका): मुंबई उच्च न्यायालयाच्या आद-शानुसार सण, गणेश उत्सव, नवरात्र उत्सव, समारंभप्रसंगी उभारण्यात येणाऱ्या मंडप, पेंडॉलच्या तपासणीसाठी पथके गठीत करण्यात आली आहेत. ही पथके लातूर महानगरपालिका हद्दीमधील मंडप, पेंडॉल तपासणी करणार असल्याची माहिती लातूरच्या उपविभागीय दंडाधिकारी यांनी दिली.

एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक गोरख दिवे (दूरध्वनी क्र. २२०१००, भ्रमणध्वनी क्र. ९८२३०९०८९०, ई-मेल आयडी ीिळवल४०५स-ारळश्र.लो), लातूरचे नायब तहसीलदार भिमाशंकर बेरुळे (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ७५८८६९२४६१, ई-मेल आयडी- श्ररीीींरहीळश्रवरीसारळश्र.लो), लातूर महानगरपालिकेचे ए झोन अधिकारी कलीम शेख (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९०११०३२४०४, ई-मेल आयडी ालश्ररीीसारळश्र.लो) यांचा समावेश असणार आहे.

शिवाजी नगर पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक दिलीप सागर (दूरध्वनी क्र. २४३१००, भ्रमणध्वनी क्र. ९५५२६६४३००, ई-मेल आयडी- ीीहिळींरक्षळ-परसरीसराळश्र.लो), नायब तहसीलदार कुलदिप देशमुख (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ९८९००८१६३५, ई-मेल आयडी- श्ररीीींरहीळश्रवरीसारळश्र.लो), लातूर महानगरपालिकेचे बी झोन अधिकारी विजय राजुरे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९०११०१०७७७, ई-मेल आयडी- ालश्ररीीसारळश्र.लो) यांचा समावेश आहे.

विवेकानंद चौक पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पो-लीस निरीक्षक सुधाकर बावकर (दूरध्वनी क्र. २५८१००, भ्रमणध्वनी क्र. ७३५०६५२३४५, ई-मेल आयडी- ीि-ीळींशझरपरपवलहुेझ४०५सराळश्र.लो), नायब तहसीलदार श्रीमती सविता माडजे (दूरध्वनी क्र. २४२९६२, भ्रमणध्वनी क्र. ८८०५५८३३०७, ई-मेल- आयडी- श्ररीीींरहीळश्र-वरीसारळश्र.लो), लातूर महानगरपालिका सी झोन अधिकारी पवन सुरवसे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९५९५२७२६९२, ई-मेल- ालश्ररीीसारळश्र.लो) यांचा समावेश राहील.

गांधी चौक पोलीस स्टेशन अंतर्गत पथकामध्ये पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे (दूरध्वनी क्र. २४२१००, भ्रमणध्वनी क्र. ९२८४२८८५१७, ई-मेल आयडी- ीसिरप-वहळलहर्रीझ४०५सराळश्र.लो), उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार सुधीर देशमुख (दूरध्वनी क्र. २४३४६२, भ्रमणध्वनी क्र. ९९६००९९७४७, ई-मेल आयडी- श्ररीीीव-ासराळश्र.लो), महानगरपालिका डी झोन अधिकारी बंडू किसवे (दूरध्वनी क्र. २४६०७५, भ्रमणध्वनी क्र. ९०११०३२३०२, ई-मेल आयडी- ालश्ररीीसारळश्र.लो यांचा समावेश आहे.

# महाराष्ट्र कामगार संरक्षण संघटना व भ्रष्टाचारमुक्त सामाजिक संघटना कार्यालयाचे नेरूळ नवी मुंबई येथे जल्लोशात उदघाटन

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक १०/०९/२०२३ रोजी सेक्टर ६ नेरूळ नवी मुंबई येथे महाराष्ट कामगार संरक्षण संघटना व भ्रष्टाचार मुक्त सामाजिक संघटना या दोन्ही सामाजिक संघटना कार्यालयाचे उदघाटन श्री. राजकुमार चंदन ( मानवता संघटना अध्यक्ष ) यांच्या शुभ हस्ते रिबिन फित कापून करण्यात आले. सर्व प्रथम छ. शिवाजी महाराज व अधुनिक भारताचे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी पुढील कार्यास मनापासून हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यावेळी श्री. डॅनी डिसोझा ( जनशक्ती संघना प्रदेशाध्याक्ष ), राजेंद्र देसाई, गणेश सावंत, विक्रम तुपे, कोंडीबा हिंगोले, शत्रुघ्न मेहेर (सचिव), अशोक साळवे (उप सचिव), अतुल मनोरे (सरचिटणीस), सत्यवाण सुर्यवंशी (सल्लागार), मंगेश सुतार (सल्लागार), फिरोज बागवान (चिटणीस), रईस शेख (सरचिटणीस), संतोष मनोरे (प्रमुख संघटक), ज्योती सचिन लाडी (महिला अध्यक्ष), माया संतोष मनोरे (महिला उपाध्यक्ष),
लक्ष्मी सातपूते (महिला सचिव), पुनम खर्चे (महिला सल्लागार), अशा मेहेर ( सरचिटणीस ), मीनाक्षी मिलिंद बोर्डे ( महिला संघटक दलित पँथर ) इत्यादी महीला कार्यकर्त्यां शेकडोंच्या संख्येत उपस्थित होत्या, महापुरुषांच्या विचाराने प्रेरित होऊन या दोन्ही संघटना नवी मुंबईतील कामगारांच्या पाठीशी सदैव खंबीर पणे उभे राहुन त्यांच्या आडी आचणीला योग्य तो न्याय मिळवून देतील व नवी मुंबईला भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी या दोन्ही संघटना वर्तमानकाळात काम करतील असा अशावाद ऊपस्थित मान्यवरांनी व्यक्त करून पुढील कार्यास मनापासून हार्दिक



सुभेच्छा दिल्या. त्यानंतर पत्रकार कल्याणराव हनवते यांनी नेहमी प्रमाने आपल्या कवी गायनातून एक संदेश दिला की, हल्ली देशात चाललेल्या सद्यपरिस्थितीवर भाष्य केले. गल्ली पासुन दिल्ली पर्यंत या देशात झाला भ्रष्टाचार... भ्रष्टाचारी आमदार, खासदार, नेता नामदार...हे आहेत पैशाने दमदार...पण यांना अता चारो मुंड्या चित्त करणार मतदार..! महागाईने सर्व जनता परेशान झाली आहे त्यावर पण गित गायनातून कला सादर केली

हि आग चहु बाजुने लागलीया संसारा
सवालाचा जबाब देरे देशाच्या सरकारा...
रेमंड शूटींग शरटींग परागाची साडी झकास मधे चालली मिल मालकांची गाडी... बळकावला कामगारांचा अन्न वस्त्र निवारा सवालाचा जबाब देरे देशाच्या सरकारा..? असा प्रश्न आपल्या गित गायनातून येथील वेवस्थेला केला. शेवटी ऊपस्थित मान्यवर व श्रोत्यांचे महाराष्ट्र कामगार संरक्षण संघटनेचे कार्याध्यक्ष गणेश सावंत यांनी अभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.

# रेणापूर येथील मराठा आरक्षण आंदोलनास आ. कराड यांची भेट; पाठिंबा जाहीर

लातूर दि.१२- मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जालना जिल्ह्यात अंतरवेली सराटी येथे मनोज जरांगे पाटील हे आमरण उपोषणास बसले आहेत त्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी रेणापूर येथे चार जणांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषण स्थळास भाजपाचे नेते विधान परिषद सदस्य आ. रमेशआप्पा कराड यांनी आज मंगळवारी भेट देऊन जाहीर पाठिंबा असल्याचे बोलून दाखविले.

वर्षानू वर्ष मराठा आरक्षणासाठी लढा देऊनही प्रत्यक्षात आरक्षण मिळत नसल्याने जालना जिल्ह्यात अंतरवेली सराटी येथे मनोज जरांगे पाटील हे आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांच्या आरक्षणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी रेणापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात योगेश देशमुख, संतोष शिंदे, अजय गाडे, धनजय भोसले हे चार तरूण गेल्या चार दिवसापासून आमरण उपोषणास बसले आहेत.

मराठा समाजाच्या मागण्या रास्त आणि योग्य असल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी दुपारी रेणापूर येथील उपोषण स्थळास भेट दिली. उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीची चौकशी करून त्यांच्याशी चर्चा केली. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे अशी भूमिका माझी आणि भारतीय जनता पार्टीची आहे असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की उपोषणकर्त्यांची



मागणी ही वैयक्तिक नसून समाजाच्या हिताची आहे. दिले जाणारे आरक्षण कोर्टात टिकले पाहिजे, तशाच पद्धतीचे आरक्षण लागू व्हावे या प्रश्नासंदर्भात जिथे जिथे गरज पडेल तिथे तिथे जाहीर भूमिका मांडून मराठा समाजाच्या मागण्या सोबत आम्ही आहोत हे दाखवून देऊ असे स्पष्टपणे बोलून दाखवले.

यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, प्रदेश सदस्य अनिल भिसे, संगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, रेणा-पूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, संभाजी सेनेचे सुधाकर माने, शिवसेनेचे सचिन दाने, कुलदीप सूर्यवंशी, दीपक पवार, शरद दरेकर, चंद्रकांत कातळे श्रीकांत सूर्यवंशी, संतोष चव्हाण, दत्ता सरवदे नवनाथ माने, विजय घोडके, गोविंद पाटील, डी. एस. पाटील, महेश सूर्यवंशी, किशन क्षिरसागर, अँड खाडप यांच्यासह अनेक जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गौरी गणपती सनानिमित्त लातूरमध्ये आनंदाचा शिधा वाटपाचा शुभारंभ



**गौरी गणपती सणानिमित्त लातूर जिल्हात आनंदाचासीधा वाटप संख्या ४०४५००इतकी आहे तर लातूर तालुक्यात शिधावाटपसंख्या ११३८३ आहे**

लातूर :- शासन निर्णयानुसार गौरी गणपती सनानिमित्त लातूरमध्ये आनंदाचा शिधा वाटपाचा शुभारंभ ला-तूर जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर - घुगे यांचे निर्देशानुसार दि. १२ सप्टेंबर २०२३ रोजी लातूर जिल्हा मधील ला-तूर तहसील अंतर्गत लातूर शहरामधील रास्त भाव दुकान नंबर ९४ अवंति नगर, सोना नगर या ठिकाणी जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियंका आयरे यांचे उपस्थित लातूर उपविभागीय अधिकारी रोहिणी न-हे, मनीषा मेने सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी, लातुर तहसीलद-ार गणेश सरोदे व नायब तहसीलदार पुरवठा कुलदीप देशमुख यांचे मार्फत व रास्त भाव दुकानदार संघटना यांचे पदाधिकारी हंसराज जाधव, सादिक शेख, पाटील, शिंदे यांची उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.



# चांद्रयान-३ च्या विजयोत्सवानिमित्त लातुरात भरगच्च कार्यक्रम

लातूर/प्रतिनिधी:भारताचे चांद्रयान अभियान यशस्वी झाल्यानिमित्त आनंदोत्सव साजरा करण्यासाठी लातूर येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

चांद्रयान ३ च्या यशस्वी प्रक्षेपणाद्वारे भारताने चंद्रावर विक्रम उतरवून जगात पहिला क्रमांक मिळविला.एवढेच नव्हे तर चंद्राच्या पृष्ठभागावर शिवशक्ती आणि तिरंग्याची अमिट छाप सोडली.भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्त्रो) शास्त्रज्ञांनी सुरुवातीपासून ते आजच्या आश्चर्यकारक कामगिरीपर्यंत,जे-जे शक्य आहे त्याच्या मर्यादा सातत्याने पुढे नेण्याचा यशस्वीपणे प्रयत्न केला आहे.या अभिमानास्पद कार्याची माहिती समाजातील सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी लातूर शहरात चांद्रयान-३ विजयोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक १५ आणि १६ सप्टेंबर रोजी लातूर शहरात विविध ठिकाणी वेगवेगळे उप्रक्रम होणार आहेत.

दि.१५ सप्टेंबर रोजी
'चांद्रयान १,२ साडे माडे ३' या पुस्तकाचे सकाळी १०वाजता गोदावरी लाहोटी कन्या शाळेत प्रकाशन होणार आहे.

भारतीय खगोलशास्त्र- प्राचीन ते अर्वाचीन या विषयावर दुपारी १.३० वाजता श्री मारवाडी राजस्थान विद्यालयात व्याखानाचे आयोजन करण्यात आले आहे.

भारताची उज्वल विज्ञान परंपरा यावर केवळ शिक्षकांसाठी चर्चासत्र होणार आहे.केशवराज विद्यालयात सायंकाळी ५.३० वाजता हे चर्चासत्र होणार आहे.रात्री ८ वाजता राजा नारायणलाल लाहोटी इंग्रजी शाळेच्या मैदानावर आकाश दर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

१६ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता चांद्रयान-३ या विषयावर जनकल्याण विद्यालय,हरंगुळ येथे
आणि भारतीय क्षेपणास्त्रे या विषयावर एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात दुपारी १.३० वाजता सचित्र सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे.रात्री ८ वाजता जनकल्याण विद्यालयात आकाशदर्शन कार्यक्रम होणार आहे.

या दोन दिवसीय कार्यक्रमासाठी पुणे येथील डीआरडीओचे समूह संचालक (निवृत्त) आणि डॉ एपीजे कलाम यांच्या सोबत कार्य केलेले प्रसिद्ध शास्त्रज्ञ काशीनाथ देवधर आणि आयुका,पुणे येथील तुषार पुरोहित उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमात खगोल विज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ,अभियंते,शिक्षक,पालक, सर्व वयोगटातील विद्यार्थी आणि जिज्ञासू नागरिक सहभागी होऊ शकतात.

# महिलांनी शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सुदृढ ठेवण्याची गरज- स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.ज्योती सूळ

लातूर : महिला सबलीकरण ही आधुनिक काळाची गरज असून प्रत्येक महिलांनी प्रबळ इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाने समाजव्यवस्थेत वा-वरले पाहिजे.युवतींनी बाह्य सौंदर्यापेक्षा आंतरिक सौंदर्याला प्राधान्य दिले पाहिजे.जगात वावरत असताना शारीरिक,मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या सुदृढ असले पाहिजे.क्रिकेट,बॅडमिंटन,पोहणे यासारखे छंद जोपासत योगासन, चांगल्या सवयी,व्यायाम,आहार घेऊन आरोग्य चांगले ठेवले पाहिजे.जीवनात आलेल्या प्रत्येक समस्यांवर मात करीत स्वावलंबी बनले पाहिजे.याचबरोबर मासिक पाळी ही नैसर्गिक देण असून त्याला न घाबरता शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य जपले पाहिजे,असे प्रतिपादन प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.ज्योती सूळ यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.११ सप्टेंबर २०२३ रोजी युवती कल्याण मंडळ २०२३-२४ चे शानदार उद्घाटन झाले आणि या निमित्ताने ' मानसिक आरोग्यावर शारीरिक आरोग्याचा प्रभाव ' या विषयावर एकदिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे व साधन व्यक्ती म्हणून प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.ज्योती सूळ व सृष्टी जगताप,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,युवती कल्याण मंडळ समन्वयक प्रा.शितल पाटील,डॉ.टी. एच.मुजावर,प्रा.एन. एन.शेख,प्रा.एस.जी.पाटील, युवती कल्याण मंडळ अध्यक्ष कस्तुरी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

सृष्टी जगताप यांनी यावेळी बोलताना सलग १२७ तास नृत्य करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये



महाविद्यालय व देशाचे नावलौकिक जागतिक पा-तळीवर कसे केले,हे सांगून प्रत्येक मुलींनी जिद्द, आत्मविश्वासाने कष्ट करीत,मोठी स्वप्न बघत सकारात्मक विचार करीत आई-वडील,आजोबा अशा नात्यांचा विश्वास जपला पाहिजे.उत्तम नियोजन,संघर्ष आणि भरपूर अभ्यास करून यश मिळविले पाहिजे,असे त्यांनी सांगितले तर उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी स्त्री ही आदर्श माता,पत्नी,मुलगी,बहीण अशा विविधांगी रुपात आपली भूमिका सक्षमपणाने जोपासत प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहेत.दयानंद विज्ञानच्याच नव्हे तर सर्वत्र मेरिटच्या गुणवत्ता यादीत मुलींच पुढे आहेत,असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड असे म्हणाले की,सृष्टी जगतापप्रमाणे प्रत्येक मुलींनी पुढे पाऊल टाकले पाहिजे.प्रतिभाताई पाटील,अरुंधती राय,इंदिरा गांधी,कल्पना मोरपिया,निर्मला सीताराम अशा स्त्रियांचा आदर्श घेऊन सामाजिक, राजकीय,आर्थिक,शैक्षणिक, साहित्य,संगीत,क्रीडा,विज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर राहिले पाहिजे.युवती कल्याण मंडळाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून नेतृत्वगुण विकसित केले पाहिजे.म्हणूनच स्त्री सक्षम झाली तरच देश सक्षम होईल.

प्रास्ताविक कस्तुरी पाटील यांनी केले तर आभार अपर्णा बावगे यांनी मानले.सूत्रसंचालन अंकिता खंलग्रे व गायत्री शिंदे यांनी संयुक्तरित्या केले.प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रेरणा सरकाळे यांनी करून दिले.यावेळी युवती कल्याण मंडळाच्या मुलींनी मासिक पाळीवर आधारित स्किट सादर केले.याप्रसंगी प्रा.मेघा आत्राम, डॉ.रामशेट्टी शेटकार,हरिराम पाटोळे,युवती कल्याण मंडळातील तृप्ती कुलकर्णी,अर्चना शर्मा,रेणुका गवळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि महिला शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE